!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५५ ०८-०२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# विद्युत निर्मितीप्रकल्प व अंडर वॉटर मेट्रो रेल्वेच्या कामांना गती द्या

## संसदीय कागदपत्रिय समितीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांचे निर्देश

**कलकत्ता ( ता. ०८ ) :** दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन आणि कलकत्ता मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. केंद्र शासनाकडे असलेल्या आपल्या मागण्या संसदिय कागदपत्रिय समिती केंद्रशासनासमोर मांडेल. असे संसदिय कागदपत्रिय समितीचे अध्यक्ष शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी स्पष्ट केले.

लोकसभेच्या पटलावर ठेवल्या जाणाऱ्या संसदिय कागदपत्रिय समितीची बैठक सोमवारी कलकत्ता येथे पार पडली. या बैठकित केंद्र शासनाच्यावतीने दामोदर नदीवर उभारण्यात येणाऱ्या पश्चिम बंगाल, उडिसा, झारखंड राज्यातील विद्युत निर्मिती केंद्राच्या कामांचा आढावा घेण्यात आला. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन या प्रकल्पाची निर्मिती केली जात आहे. तसेच देशातील बहुचर्चित हावडा येथील पाण्याखालुन धावणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पाहणी करुन या प्रकल्पाला गती देण्याच्या सुचना संसदिय कागदपत्रिय समितीने केल्या आहे. कलकत्ता मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून या प्रकल्पाची निर्मिती केली जात आहे. भारतातील पाण्याखालुन धावणारी ही पहिली रेल्वे असणार आहे. निधी संबंधात केंद्र शासनाकडे असलेल्या दोन्ही कॉर्पोरेशनच्या मागण्या केंद्रासमोर ही संसदीय कागदपत्रिय समिती मांडेल परंतु निधी अभावी प्रकल्पाची कामे खोळंबू ठेवू नका अशा सुचना अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकिस समितीचे सदस्य विना देवी, लक्ष्मण गिल्वा, जाटवा, लोकसभेच्या संचालिका रिटा जैलखानी, अतिरिक्त संचालक माया लिंगी, अध्यक्षांचे सचिव उत्तमकुमार सिंग व कमिटी ऑफिसर प्रेम राजन, केएमआरसीचे सी. एम. डी. आश्विनकुमार कपूर आणि वरिष्ठ अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525